# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.)

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपिल**

**क्र.रामाआ नाशिक/द्वितीय अपिल क्र.५४/२०२४/नाशिक**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री.जावेद जहूर आमिर<br>रा.रुम नं.१४, साईदर्शन अपार्टमेंट, पखाल रोड, द्वारका रोड, नाशिक ४२२००६. | व्यवस्थापक,<br>जिल्हा उद्योग केंद्र,<br>शासकीय आय.टी.आय. जवळ,<br>सातपूर, नाशिक ४२२००७. | महाव्यवस्थापक,<br>जिल्हा उद्योग केंद्र,<br>शासकीय आय.टी.आय. जवळ,<br>सातपूर, नाशिक ४२२००७. |

**द्वितीय अपिल सुनावणी दि.२६/०४/२०२४**

| मूळ अर्ज दिनांक | मूळ अर्ज ज.मा.अ. यांना प्राप्त दिनांक | ज.मा.अ. यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| २०/०९/२०२३ | २१/०९/२०२३ | १७/१०/२०२३ | २६/१०/२०२३ | -- | -- |

अपिलार्थी यांनी दि.०३/०१/२०२२ रोजीच्या अर्जान्वये "जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास दुष्ट हेतूने नाकारले आहे" असे कारण नमूद करुन आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे.

२. सदर द्वितीय अपिलाच्या सुनावणीस तत्कालीन/विद्यमान जन माहिती अधिकारी आणि तत्कालीन/विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते. अपिलाची सुनावणी झाल्यानंतर उशिराने अपिलार्थी यांच्यासह त्यांचे प्रतिनिधी ॲड मयुर पांगारकर उपस्थित होते.

३. अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.२०/०९/२०२२ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे "नाशिक येथील ता.सिन्नर येथील माळेगाव एमआयडीसी मधील भूखंड क्र.अे-५, नमन नंदिनी इंडस्ट्रीज या भूखंड धारकाने दि.०१/०१/२०१३ ते दि.१८/०९/२०२३ या कालावधीमध्ये पीएसआय-१३ व पीएसआय-१९ मध्ये इलिजिबिलिटी सर्टिफिकेट घेतलेली आहे. त्यानुसार किती क्लेम केलेले आहे. या अंतर्गत त्याला आतापर्यंत किती अनुदान रक्कम शासनाकडून या योजनेत देण्यात आलेली आहे तसेच सदर भूखंडाबाबत इतरही माहिती देण्यात यावी" याची माहिती मागितली आहे.

४. आज सुनावणीवेळी जन माहिती अधिकारी यांनी असे नमूद केले की, अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज दि.२१/०९/२०२३ रोजी प्राप्त झाला असून त्यांना दि.१७/१०/२०२३ च्या पत्रान्वये संबंधित उद्योग घटकास पात्रता प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही असे कळविले आहे. तद्नंतर अपिलार्थी यांनी दि.२६/१०/२०२३ अन्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिल दाखल केले आणि दि.२१/११/२०२३ रोजी लेखी निवेदन दिले आहे. सदरहू लेखी निवेदनात अपिलार्थी यांनी १० उद्योग घटकांचे नांवे नमूद करुन उद्योग घटकांची माहिती अधिकार अंतर्गत माहिती मागितली होती त्यासाठी मी आपल्याकडे अपिल अर्ज केले होते. सदरची माहिती माझ्या कोणत्याच कामात येणार

नसल्यामुळे मला आता कोणत्याच उद्योग घटकाची माहिती नको आहे. यानंतर भविष्यात सदरच्या उद्योग घटकांची माहिती मी कधीच मागणार नाही. माझे माहिती अधिकार कायद्यांतर्गत केलेले सर्व अर्ज मी कोणाच्याही दबावाला बळी न पडता माझ्या स्व:इच्छेने मागे घेत असून माझी याबाबत कोणतीच तक्रार नाही आणि भविष्यात पण असणार नाही असे नमूद केले आहे. तसेच अपिलार्थी यांनी आयोगास लिहिलेले व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रत अग्रेषित केलेले लेखी निवेदनात देखील ११ उद्योग घटकांबाबत असे नमूद केले आहे की, मी आयोगाकडे अपिल अर्ज क्र.५३/२०२४ ते ६३/२०२४ दाखल केले होते. सदरची माहिती माझ्या कोणत्याच कामात येणार नसल्यामुळे मला आता कोणत्याच उद्योग घटकाची माहिती नको आहे, यानंतर भविष्यात सदरच्या उद्योग घटकांची माहिती मी कधीच मागणार नाही. माझे माहिती अधिकार कायद्याअंतर्गत केलेले तक्रार अर्ज तसेच अपिल अर्ज मी कोणाच्याही दबावाला बळी न पडता माझ्या स्व:इच्छेने जिल्हा उद्योग केंद्र आणि माहिती आयोग, खंडपीठ नाशिक येथे केलेले तक्रार व अपिल अर्ज मागे घेत असून माझी याबाबत कोणतीच तक्रार नाही आणि भविष्यात पण असणार नाही. अपिलार्थी यांनी लेखी निवेदन दिल्यानंतर पुन्हा दि.०५/१२/२०२३ व दि.१८/१२/२०२३ च्या अर्जान्वये माहिती देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

आजची सुनावणी संपल्यानंतर उशिराने अपिलार्थी यांच्यासह त्यांचे प्रतिनिधी ॲडव्होकेट यांनी आयोगासमोर हजर राहून लेखी निवेदन सादर केले व असे नमूद केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीमुळे कुठल्याही प्रकारची गुपिते उघड होणार नाही. तसेच सदर उद्योग घटकांना क्षती अथवा हानी पोहोचेल अशा स्वरुपाची कुठल्याही प्रकारची माहिती मागितलेली नाही किंवा सदरील माहिती अपिलार्थी यांना दिल्यामुळे सदर उद्योग घटकांना कुठल्याही प्रकारचे हानी किंवा क्षती पोहोचणार नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी चुकीचे कारण नमूद करुन माहिती देण्यास अडथळा केलेला आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कुठलाही आदेश केलेला नाही. तरी अपिलार्थी यांनी मागितलेली व देता येण्यासाठी सर्व माहिती देण्यात यावी व माहिती अधिकारी यांचेवर कलम २० प्रमाणे शास्ती करण्यात यावी.

५. याप्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध असलेली कागदपत्रे आणि युक्तिवादावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी दि.१७/१०/२०२३ च्या पत्रान्वये अपिलार्थी यांना त्यांच्या समजुतीप्रमाणे मागणी केलेल्या माहितीबाबत वस्तुस्थितीदर्शक उत्तर कळविले आहे. तसेच अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जात माळेगाव एमआयडीसी ता.सिन्नर मधील भूखंड क्र.अे-५, नमन नंदिनी इंडस्ट्रीज या भूखंड धारकाने दि.०१/०१/२०१३ ते दि.१८/०९/२०२३ या कालावधीमध्ये पीएसआय-१३ व पीएसआय-१९ मध्ये इलिजिबिलिटी सर्टिफिकेट घेतलेली आहे असे नमूद केले आहे परंतू त्याबाबत कोणतेही कागदपत्रे आयोगाकडे पुराव्यादाखल सादर केलेली नाहीत. तद्नंतर अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलाच्या अनुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी यांना दि.२१/११/२०२३ रोजी लेखी निवेदन दिले असून त्यामध्ये नमूद १० उद्योग घटकांचे नांवे नमूद करुन उद्योग घटकांची माहिती अधिकार अंतर्गत माहिती मागितली होती त्यासाठी मी आपल्याकडे अपिल अर्ज केले होते. सदरची माहिती माझ्या कोणत्याच कामात येणार नसल्यामुळे मला आता कोणत्याच उद्योग घटकाची माहिती नको आहे. यानंतर भविष्यात सदरच्या उद्योग घटकांची माहिती मी कधीच मागणार नाही. माझे माहिती अधिकार कायद्यांतर्गत केलेले सर्व अर्ज मी कोणाच्याही दबावाला बळी न पडता माझ्या स्व:इच्छेने मागे घेत असून माझी याबाबत कोणतीच तक्रार नाही आणि भविष्यात पण असणार नाही असे नमूद केले आहे. त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाचा निर्णय पारित न करता त्यांची सर्व प्रथम अपिल निकाली काढलेले आहेत. त्यानंतर अपिलार्थी यांनी दि.०५/१२/२०२३

व दि.१८/१२/२०२३ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांना माहिती देण्याबाबत विनंती केली आहे. वास्तविक अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती आता नको असून त्याबाबत कोणतीही तक्रार नसल्याने माहिती अधिकारांतर्गत केलेले सर्व अर्ज स्व:इच्छेने मागे घेत असल्याबाबत लेखी निवेदन दिलेले असतांना पुन्हा माहिती मागणीसाठी विनंती अर्ज करणे हे अपिलार्थी यांचे वागणे संशयास्पद आहे. याव्यतिरिक्त अपिलार्थी यांचे दि.०५/१२/२०२३ रोजीचे पत्र / विनंती अर्ज कोणत्या अपिलांसंदर्भात आहे याचा कोणता उल्लेख पत्रात केलेला नाही व ते पत्र जन माहिती अधिकारी यांना दिल्याचा पुरावा देखील आयोगाकडे सादर केलेला नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.१७/१०/२०२३ च्या पत्रान्वये उत्तर दिलेले असतांनाही कोणताही पत्रव्यवहार केला नाही असे अपिलार्थी यांचे म्हणणे चुकीचे आहे.

सबब, याप्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपिल क्र.५४/२०२४/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

( भूपेन्द्र गुरव )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :-

---

जावक क्र. आ:-१९२६, दिनांक :- 04/07/2024